ISSN 2278-8808
SJIF 2015 = 5.403
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# संयुक्त महाराष्ट्र स्थापनेचे तत्वज्ञान

**निशा सीताराम मोरे, Ph. D.**

*(सहयोगी प्राध्यापक), श्रीमती. सी. के. गोयल कला व वाणिज्य महाविद्यालय, पुणे*

*Scholarly Research Journal's* ***is licensed Based on a work at*** *www.srjis.com*

महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली. मराठी भाषिकांचे राज्य बनावे ही मागणी फार जुनी होती. महाराष्ट्र राज्याची भाषेच्या निकषावर पुनर्रचना करावी अशी मागणी इंग्रजांच्या काळापासून होत होती. महात्मा गांधी व टिळक यांनी भाषावार प्रांतरचना झाली पाहिजे असे मत व्यक्त केले होते. इ. स. १९०५ पासून बंगालची फाळणी करण्याचे ठरले तेंव्हापासून ही मागणी अधिक प्रखररित्या पुढे आली. ब्रिटिशांनी भारतातील आपले साम्राज्य वाढविले व त्यांच्या शासनकारभाराच्या सोयी साठी प्रांत स्थापन केले होते. प्रांत निर्मितीला कोणताही शास्त्रीय आधार नव्हता. भारतात केवळ आसाम हाच एकमेव प्रांत असा होता की ज्या प्रांतात भाषिक समानता व एकजिनसीपणा होता. इतर प्रांतात भाषिक सरमिसळ मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होती.

**भाषिक राज्याची मागणी:** संयुक्त महाराष्ट्राची मागणी ही भाषावार प्रांतरचनेच्या मागणी इतकीच जुनी होती. विठ्ठल ताम्हणकर यांनी १९१७ मध्ये ' लोकशिक्षण' या मासिकात 'तिभंगलेला महाराष्ट्र' हा लेख नकाशासह प्रकाशित केला. मराठी प्रदेश एकत्र आणुन एकसंघ महाराष्ट्राची निर्मिती केली गेली. विनोबा भावे यांनी 'महाराष्ट्र धर्म ' या लेखात संयुक्त महाराष्ट्राचा पुरस्कार केला होता. धनंजय गाडगीळ, प्रबोधनकार ठाकरे, ग. त्र्य. माडखोलकर, दत्तो वामन पोतदार, लालजी पेंडसे, मिरजकर इत्यादी मान्यवरांनी या मागणीस पाठिंबा दर्शविला होता.

**संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचे स्वातंत्र्यपूर्व प्रयत्न** : संयुक्त महाराष्ट्र निर्मिती चळवळीचा पाया इ.स. १९३८ मध्ये वऱ्हाडात घातला गेला. त्यावेळी वऱ्हाड हा प्रदेश जुन्या मध्यप्रांत व वऱ्हाड (सी.पी. अँड बेरार प्रॉव्हिंस) या प्रांतात समाविष्ठ होता. सी.पी. बेरार प्रांताचे विधिमंडळ सदस्य शामराव देशमुख यांनी १९३८ मध्ये असा ठराव मांडला होता की सी.पी बेरार वऱ्हाडच्या जोडप्रांतातुन मराठी भाषिक वऱ्हाड अलग करावे. इ.स. १९३८ मध्ये मुंबईत मराठी साहित्य संम्मेलन भरले असता त्यात वऱ्हाडसह महाराष्ट्राचा एकभाषी प्रांत त्वरित बनवावा आणि मराठवाडा, गोमांतक हे दोन्ही प्रांत त्यात समाविष्ट करावेत अशी मागणी केली. यानंतरच्या वर्षी नगर मध्ये अधिवेशन भरले असता या मागणीचा पुनरुच्चार करण्यात आला व सर्व मराठी भाषिक प्रदेशाचा मिळून बनणाऱ्या प्रांताला ' संयुक्त महाराष्ट्र' असे नाव द्यावे असे एकमताने ठरले. स्वातंत्र्य प्राप्ती नंतर भाषावार घटकराज्य निर्माण केले जावेत ही मागणी मराठी माणसाची अस्मितेचा प्रश्न बनला.

**महाराष्ट्राच्या एकीकरणाचा प्रश्न :** मराठी भाषिक लोकांचे राज्य निर्माणाच्या मार्गात काही अडथळे होते. यात प्रामुख्याने विदर्भाचा प्रश्न, मराठवाड्याचा प्रश्न, मुंबईचा प्रश्न निर्माण झाले होते.

**विदर्भ प्रश्न :** ब्रिटिश काळात विदर्भाचा समावेश मध्यप्रांतात झाला होता. नागपूर ही त्या प्रांताची राजधानी होती. भाषिक राज्याच्या मागणीत विदर्भातील नेत्यांनी वेगळ्या विदर्भाची मागणी केली. १९४० साली बॅ. रामराव देशमुख, बापुजी अणे व ब्रिजलाल बियाणी या नेत्यांनी ' महाविदर्भ समिती स्थापन केली'. संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाल्यास पशिम महाराष्ट्राचेच त्यावर वर्चस्व राहिल अशी भीती विदर्भातील नेत्यांना वाटत होती.

**बेळगाव – मराठी साहित्या सम्मेलन (१९४६):** साली बेळगाव येथे भरलेल्या मराठी साहित्य संम्मेलनात संयुक्त महाराष्ट्र स्थापन करण्यात यावे असा ठराव पास करण्यात आला. याचवर्षी मराठी भाषिक राज्य स्थापनेसाठी आवश्यक ते प्रयत्न करण्यासाठी ' संयुक्त महाराष्ट्र समिती ' नामक संस्था स्थापन करण्यात आली.

**अकोला करार (१९४७) : वि**दर्भातील नेत्यांची भीती दूर करण्यासाठ व संयुक्त महाराष्ट्राचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी १९४७ साली अकोला करार करण्यात आला. संयुक्त महाराष्ट्रात विदर्भ उपप्रांत असावा, विदर्भासाठी वेगळे विधिमंडळ व मंत्रिमंडळ असावे यासारख्या अटी या करारात होत्या. राज्यघटनेत उपप्रांताची तरतूद नसल्याने अकोला काराराचे महत्व संपले.

**मराठवाडा प्रश्न (१९४८) :** स्वातंत्र्यपूर्व काळात मराठवाडा या मराठी भाषिक प्रदेशाचा समावेश हैदराबाद संस्थानात निजामाच्या राजवटी अंतर्गत होता. निजामी राजवट जुलूमी होती. निजामाच्या जुलूमी राजवटी विरोधी रामानंद तीर्थ यांनी लढा उभारला. १९४८ साली हैदराबाद संस्थान भारतात विलीन करण्यात आले. मराठवाड्याच्या जनतेचा महाराष्ट्र राज्यात समावेश व्हावा अशी मागणी पुढे आली होती.

**राज्य पुनर्रचना आयोग व नागपूर करार: (१९५३)** केंद्र सरकारने भाषिक तत्वावर राज्यांची पुनर्रचना करण्यासाठी राज्यपुनर्रचना आयोग स्थापन केला म्हणून संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मितीसाठी तातडीने हालचाल करणे आवश्यक ठरले. मराठी भाषिक प्रदेशांच्या एकीकरणासाठी विदर्भ आणि मराठवाड्याच्या नेत्यांची संमती घेणे आवश्यक होते. विदर्भातील आणि पश्चिम महाराष्ट्रातील भाऊसाहेब हिरे, यशवंतराव चव्हाण, नाना कुंटे, रामराव देशमुख, शेषराव वानखेडे, गोपाळराव खेडकर यासारख्या नेत्यांनी १९५३ साली नागपूर करार केला. नागपूर करारात काही महत्याच्या अटी होत्या. त्यात मुंबई प्रांत, मध्य प्रदेश आणि हैदराबाद संस्थान यातील सर्व मराठी भाषिक प्रदेशांचे मिळून महाराष्ट्र राज्य असावे व त्याची राजधानी मुंबई असावी, लोकसंख्येच्या प्रमाणात राज्याच्या आर्थिक संसाधनांचे वाटप केले जावे यासारख्या काही मुद्यांचा करारात समावेश होता.

**मुंबईचा प्रश्न:** मुंबई देशाची आर्थिक राजधानी मानली जाते. या शहरात गुजराती, मारवाडी, व्यापारी, उद्योगपती यांचे हितसंबंध गुंतले होते. मुंबईचा समावेश महाराष्ट्रात करण्यास ही मंडळी उत्सुक नव्हती.

**विविध आयोग व आंध्रप्रदेश राज्याची स्थापना:** भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नाचा विचार करण्याकरिता घटना परिषदेने न्यायमूर्ती दार या एकसदस्यीय आयोगाची नेमणूक (१९४८), केली. न्या. दार यांनी भारतभर दौरा केल्यावर प्रांतांच्या भाषावार पुनर्रचनेस विरोध दर्शविला. दार आयोगाचा अभ्यास करण्यासाठी जेव्हीपी आयोग स्थापन करण्यात आला. या आयोगात – जवाहरलाल नेहरु –वल्लभभाई पटेल, पट्टाभीसीतारामैया यासाख्या दिग्गज नेत्यांचा समावेश होता. विविध आयोग स्थापन करून देखील संयुक्त महाराष्ट्र स्थापनेचा प्रश्न लांबणीवर पडत होता. त्यामुळे मराठी भाषिक जनता अस्वस्थ झाली होती. न्यायमूर्ती दार यांच्या मते 'प्रादेशिकता आणि राष्ट्रीयता या दोन परस्पर विरोधी भावना आहेत; भाषावार घटकराज्य निर्माण झाल्यास प्रादेशिकत वाढीस लागून ही बाब राष्ट्रीयतेस धोका निर्माण करू शकते'. तर पंडित जवाहरलाल नेहरुनी भाषावार प्रांतरचनेस तत्वत: पाठिंबा दर्शविला होता तरी ' प्राप्त परिस्थिती लक्षात घेता आंध्र प्रदेश वगळून हा निर्णय लांबणीवर टाकणे योग्य आहे अशी शिफारस केली. त्यामुळे महाराष्ट्र निर्मितीत अडथळे निर्माण झाले त्यामुळे भाषावार प्रांतरचनेच्या समर्थकांना घटना परिषदेत माघार घ्यावी लागली. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत समाजवादी व साम्यवादी पक्षांनी भाषावार प्रांतरचनेची मागणी केली होती परंतु या पक्षांना निवडणुकीत पराजयाचा सामना करावा लागला होता त्यामुळे या प्रश्नावर पडदा पडला आहे असा समज निर्माण झाला होता ; त्यात १९५२ मध्ये तत्कालीन मद्रास प्रांत राज्यातील तेलगू भाषिकांनी आंध्र प्रदेशच्या मागणीकरिता आंदोलन सुरु केले होते. जेष्ठ गांधीवादी नेते पोट्टी श्रीरामालु यांनी सदर मागणीसाठी आमरण उपोषण केले व त्यात त्यांत त्यांचा मृत्यू झाला त्यामुळे हे आंदोलन चिघळले असता केंद्र सरकारने १९ डिसेंबर १९५२ रोजी मद्रास राज्याची विभागणी करून आंध्रप्रदेश राज्याची स्थापना केली. आंध्र प्रदेश निर्मीती नंतर संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाने पुन: डोके वर काढले. १९५३ साली केद्र सरकारने न्या. फाजल अली यांच्या अध्यक्षतेखाली याच प्रश्नावर राज्यपुनर्रचना आयोगाची स्थापना केली. हृदयनाथ कुंझरू व सरदार पण्णीकर या आयोगाचे अन्य सदस्य होते. फाजल अली कमिशनने अ,ब,क आणि ड वर्गाची १६ घटकराज्ये आणि ६ केंद्रशासित प्रदेश स्थापन करण्याची शिफारस केंद्राकडे केली. त्या आधारे संसदेने भाषावार पुनर्रचना केली. आयोगाने देशाच्या इतर प्रदेशातील लोकांची भाषिक राज्याची मागणी मान्य केली. मात्र संयुक्त महाराष्ट्र व गुजरात राज्य निर्माण करण्याची मागणी मान्य केली नाही. लोकमताच्या इच्छेविरुद्ध द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना करण्यात आली. मराठवाड्याचा द्विभाषिकात समावेश करावा मात्र विदर्भाचे वेगळे राज्य निर्माण करावे अशी शिफारस आयोगाने केल्यामुळे महाराष्ट्रत प्रक्षोभ निर्माण झाला.

**सेनापती बापट यांचे नेतृत्व : (१९५५)** १८ नोव्हेंबर १९५५ रोजी त्रिराज्य मुंबई योजनेचा मसुद्याला मुंबई विधानसभेची मंजुरी मिळणार होती. मोरारजी देसाई मुंबई राज्याचे मुख्यमंत्री होते. यांच्या विरोधात कॉंग्रेस पक्षाचे काही आमदार होते. स.का. पाटील मोरारजी देसाई यांच्या बाजूने भक्कम पणे उभे होते. त्रिराज्य योजनेच्या निषेधाच्या पार्श्वभूमीवर १८ नोव्हेंबर १९५५ रोजी सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली मोर्चाचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर मोठ्या प्रमाणात हिंसाचार व दंगे पेटले. २१ नोव्हेंबर १९५५ रोजी सर्व मुंबईभर हरताळ पाळण्यात आला. हजारो नागरिक या मोर्चात सामिल झाले होते. पोलिसांना मोर्चा आवरणे कठीण गेले तेव्हा त्यांनी मोर्चाकरींवर गोळीबार केला असता पोलिसांच्या अंधाधुंद

गोळीबारात १५ जणांनी आपला प्राण गमावला. ४०० पेक्षा जास्त संपकऱ्यांना अटक झाली. या हुतात्म्यांमधे फणसवाडीचा तरूण विद्यार्थी सीताराम पवार हा हुतात्मा झाला. पा.वा. गाडगीळ यांनी या घटनेच्या निषेधार्थ विधान परिषदेच्या सदस्यत्वाचा तात्काळ राजीनाम दिला. पुणे, नाशिक, कोल्हापूर, बेळगाव मध्ये या घटनेचे तीव्र पडसाद उमटले. या घटनेच्या निषेधार्थ कडकडीत बंद पाळण्यात आला. हे आंदोलन चिघळलेच. मोरारजी देसाई यांच्या कारकिर्दित १०५ लोक पोलिस गोळीबारात हुतात्मे झाले.

**मुंबई केंद्रशासित प्रदेशाची घोषणा :** मुंबई शहराला केंद्रशासित प्रदेश करण्याची घोषणा नेहरू यांनी केली. संयुक्त महाराष्ट्राच्या पुरस्कर्त्यांनी याबाबत कोणतीही तडजोड करण्यास नकार दिला.

**संयुक्त महाराष्ट्र समिती (१९५६) व सार्वत्रिक निवडणूक (१९५७) :** संयुक्त महाराष्ट्र स्थापनेसाठी संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना एस. एम. जोशी यांनी ८ फेब्रुवारी १९५६ रोजी पुण्यात केली. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या स्थापनेमुळे संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाला काँग्रेसेतर पक्षांची या समितीत एकजूट निर्माण झाली होती. एस. एम. जोशी यांच्या प्रयत्नातून संयुक्त महाराष्ट्र चळवळ स्थापन झाली. संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे अध्यक्ष केशवराव जेधे होते. या समिती द्वारे सत्याग्रह करण्यात आला. १६ फेब्रुवारीला ' महाराष्ट्रदिन' पाळणे, २९ फेब्रुवारीला असहकार पाळणे, राज्यविधिमंडळ, महापालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत, सल्लागार समित्यांचे राजीनामे व सरकारी कामावर बहिष्कार या सारखे उपक्रम संयुक्त महाराष्ट्र समितीने राबविले. संयुक्त महाराष्ट्र समितीने दिल्लीत मोर्चा काढला. १६ मार्च रोजी बेळगाव, पुणे, महाड, सांगली, ठाणे येथे सत्याग्रहींची मोठ्या प्रमाणात धरपकड करण्यात आल्यामुळे व त्यांना हातकड्या घालून कोर्टात उभे केल्यामुळे सर्व महाराष्ट्रभर तिव्र संतापाची लाट उसळली.

सदर समितीमध्ये काँग्रेसेतर पक्ष एकत्र आले होते. साम्यवादी पक्ष, प्रजासमाजवादी, शेतकरी कामगार पक्ष, शेडुल्डकास्ट फेडरेशन, लाल निशाणी गट, मोहिते – खाडिलकर यांचा मजदूर किसान पक्ष, हिंदुत्ववादी हिंदुमहासभा, भारतीय जनसंघ, रिव्होल्युशनरी कम्युनिस्ट पक्ष, बोल्शेविक पक्ष आणि मुंबई शहरातील बंडखोर काँग्रसवाल्यांचा जन काँग्रेस इत्यादी संयुक्त महाराष्ट्र समितीचे घटक पक्ष होते. ११ बिगर काँग्रेसपक्ष व गट आणि अपक्ष यांनी संयुक्त महाराष्ट्र समितीचे स्वरुप होते. लोकआंदोलनाचा आविष्काराचे स्वरुप अथवा प्रादेशिक अस्मितेचा पुरस्कार करणारा एक दबाव गटाचे रुप संयुक्त महाराष्ट्र समितीने धारण केले होते. या समितीत थोडेफार हेवेदावे होते मात्र संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होईपर्यंत त्यांची एकजूट टिकून राहिली.

बिगर काँग्रेसी पक्षाच्या संयुक्त महाराष्ट्र समितीच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ साम्यवादी नेते अमृत डांगे, उपअध्यक्ष पदी जनकाँग्रेसचे त्र्य. रा. नरवणे व समितीच्या सरचिटणीसपदी प्रजासमाजवादी पक्षाचे नेते एस्. एम्. जोशी यांची एकमताने निवड करण्यात आली. पक्षाच्या संसदिय मंडळावर घटक पक्षांच्या नेत्यांना सामावून घेण्यात आले होते. सुप्रसिद्ध लेखक आचार्य अत्रे समितीचे मुख्य प्रवक्ते बनले. आचार्य अत्र्यांनी मराठा या वृत्तपत्राची स्थापना करून या वृत्तपत्राद्वारे संयुक्त महाराष्ट्राचा विचार अधिक प्रखरपणे जनतेपुढे मांडला. अशाच प्रकारची कामगीरी 'प्रभात ' वृत्तपत्राचे वालचंद कोठारी, 'केसरी' चे

जयवंतराव टिळक, 'सकाळ' चे ना. भी. परुळेकर, ' प्रबोधनकार ' ठाकरे, सेनापती बापट, भाई माधवराव बागल इत्यादींचा संयुक्त महाराष्ट्र समितीच्या कार्यात महत्वपूर्ण सहभाग होता. उद्धवराव पाटील, नाना पाटील, दत्ता देशमुख, यशवंतराव मोहिते, रघुनाथ खाडिलकर यासारख्या डाव्या विचारसरणीच्या नेत्यांकडे समितीच्या प्रचाराची धुरा होती.

संयुक्त महाराष्ट्र समितीने मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या समस्येवर राज्यव्यापी आंदोलन उभारले. या आंदोलनात ग्रामीण जनता हिरीरिने सामिल झाली. या आंदोलनात मराठी भाषिकांची अभूतपूर्व एकजूट पहायला मिळाली. या एकजुटीमुळे मुंबईशहर केंद्रशासित करण्याचा विचार मागे पडला. गांधीवादी नेते विनोबाभावे व समाजवादी नेते जयप्रकाश नारायण यांनी या प्रश्नासंबंधी पं. नेहरूंची भेट घेतली पण त्यांच्या प्रयत्नांना यश आले नाही. नेहरुंच्या मनात द्विभाषिक महराष्ट्र राज्य स्थापन करण्याचा विचार होता.

**द्विभाषिक महाराष्ट्र राज्य: यशवंतराव चव्हाणांचे सौम्य धोरण :** १ नोव्हेंबर १९५६ रोजी पंडित जवाहरलाल नेहरूंच्या इच्छेप्रमाणे द्विभाषिक महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री बनले.

**द्विभाषिकास विरोध :** मराठी जनतेने द्विभाषिक महाराष्ट्र राज्यास आपला विरोध दर्शविला. खेडोपाडी मराठी भाषिकांनी सत्याग्रह, निषेध, निदर्शने, मशालमोर्चे काढून आपला विराध व्यक्त केला. मशाल मोर्चात पन्नास हजाराहून अधिक लोक सहभागी झाले होते. मराठी भाषिक माणसाप्रमाणेच गुजराती भाषिक देखील द्विभाषिकावर नाराज होते.

**मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे सौम्य धोरण:** १ नोव्हेंबर १९५६ रोजी द्विभाषिक मुंबई राज्य अस्तित्वात आले होते. नवीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांनी आंदोलनकर्त्यांच्या बाबतीत सामंज्यस्याची व सौम्य भूमिका घेतल्यामुळे आंदोलनकर्ते व शासन यांच्यातील दुरावा उत्तरोत्तर कमी झाला. आंदोलनकर्त्यावर गोळीबार न करण्याचे स्पष्ट आदेश त्यांनी दिले होते. आंदोलन करणाऱ्या जमावाला कसे पांगवावे याचे खास प्रशिक्षण पोलिसदलास देण्यात आले. यावरून मुख्यमंत्री चव्हाणांचे धोरण सौम्य व संयमी होते हे दिसून येते.

**निवडणूक निकाल (१९५७ )** १९५७ च्या निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र समितीला पश्चिम महाराष्ट्रात आणि मुंबईत मोठे यश मिळाले यावरून संयुक्त महाराष्ट्राच्या बाबतीत मराठी जनतेच्या भावना तीव्र आहेत हे केंद्रीय नेतृत्वाला कळाले.

संयुक्त महाराष्ट्र समितीची निवडणुकीची प्रचार मोहिम अत्यंत आक्रमक होती. खेड्या पाड्यात कॉंग्रस पक्षाला अनेक ठिकाणी गावबंदी करण्यात आली प्रसंगी संतप्त लोकांनी कॉंग्रेसच्या प्रचार सभा उधळून लावल्या. लोक कॉंग्रस नेत्यांच्या गाडीवर दगडफेक करत होते. मराठी भाषिक जनमत कॉंग्रेसपक्षाला प्रतिकूल बनले होते. सार्वत्रिक लोकसभेच्या निवडणूकीत कॉंग्रेस पक्षाला ४४ पैकी २१ जागा व विधान सभेत २६४ पैकी १३५ जागा म्हणजेच काठावरचे बहुमत मिळाले. पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मुंबई शहर येथे कॉंग्रेस पक्षाला अपयश पदरात पडले. या उलट संयुक्त महाराष्ट्र आघाडीला लोकसभेच्या २३ व विधानपरिषदेच्या १२९ जागा मिळाल्या. संयुक्त महाराष्ट्र समितीला अपेक्षापेक्षा या निवडणुकीत यश मिळाले.

**पंडित नेहरु आणि संयुक्त महाराष्ट्राची घोषणा** संयुक्त महाराष्ट्र समितीचे आंदोलन सतत सुरुच होते. विधिमंडळात संधी मिळेल त्यावेळी जेष्ट नेते संयुक्त महाराष्ट्राची मागणी पुढे करत हाते. ३ नोव्हेंबर १९५७ रोजी प्रतापगड येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करण्याकरिता पं. नेहरुंना आमंत्रित केले असता त्यांच्या मार्गावर आणि प्रतापगडावर हजारो मराठी भाषिक लोकांनी मोठ्यासंख्येने निदर्शने केली व महाराष्ट्र निर्मितीची मागणी केली.

द्वेभाषिकाचा प्रयोग म्हणावा त्याप्रमाणे यशस्वी झाला नाही कारण गुजराती भाषिक जनता वेगळ्या गुजरात राज्यासाठी व मराठी भाषिक जनता संयुक्त महाराष्ट्र राज्याची मागणी करत होते. या परिस्थितीत द्विभाषिक राज्य या ऐवजी महाराष्ट्र आणि गुजरात अशी स्वतंत्र दोन राज्य निर्माण करायला पाहिजे हा विचार मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी केंद्रीय नेत्यांना पटवून दिल्यावर महाराष्ट्र राज्यनिर्मितीचा मार्ग मोकळा झाला. संविधानात्मकरित्या एका ठरावाद्वारे द्विभाषिक राज्य संपुष्ठात आणण्यात आले.

दि. १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. पंडित नेहरूच्या हस्ते महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचा सोहळा पार पडला. संयुक्त महाराष्टाची स्थापना हे मराठी भाषिकांचे स्वप्न होते. आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांना अनेक अडथळ्यांना पार करावे लागले. अनेकांना त्यात हौतात्म पत्करावे लागले. मराठी भाषिकांना संप , बंद, असहकार , सत्याग्रह , मोर्चे यासारख्या लोकशाही मार्गांचा अबलंब करून त्यांना संयुक्त महाराष्ट्र प्राप्त झाले. संयुक्त महाराष्ट्र स्थापनेत काँग्रेसेतर पक्ष व त्यांच्या नेत्यांनी तसेच वृत्तपत्रांनी आपली महत्वाची भूमिका बजावली.

## संदर्भ सूची

*गाठाळ , २०१३, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद*

*जैन अशोक, १९९८, महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, शेठ पब्लिशर्स, मुंबई*

*पळशीकर, बिरमल, (संपा), २००४, महाराष्ट्राचे राजकारण – राजकिय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे*

*मोरे दिनेश, डिसेंबर २००६, आधुनिक महाराष्ट्राचा परिवर्तनाचा इतिहास,(१८१८ – १९६०) के. एस. पब्लिकेशन, पुणे*

*मंजुळकर, वाघ, आघाव, २०१०, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर*

*राठी शुभांगी दिनेश, २०१४, महाराष्ट्रातील सामाजिक – राजकीय चळवळी व प्रशासन, अथर्व पब्लिकेशनन्स, धुळे*

*वराडकर र. घ, २००८, महाराष्ट्राचे शासन व राजकारण, निराली प्रकाशन, पुणे*